आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

रविवार, दिनांक : २३ जून, २०२४

ठळक बातम्या

1. १८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन उद्यापासून, २६ जून रोजी होणार सभापतीपदाची निवडणूक.
2. केंद्रीय गुन्हे अन्वेषण संस्था करणार नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचा तपास.
3. मृदा आणि जलसंधारण विभागातील 670 पदांसाठी दिनांक 14,15 आणि 16 जुलै रोजी TCS कंपनीच्या 10 अधिकृत केंद्रावर होणार फेरपरीक्षा.

आणि

4. नागपूर जिल्ह्यातील एक हजार ९१० आशा सेविकांचं कार्यालयीन कामासाठी मोबाईल सुविधेद्वारे सक्षमीकरण -उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात वितरण.

#####

**लोकसभा अधिवेशन**

१८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. तर राज्यसभेचं अधिवेशन येत्या २७ तारखेला सुरू होणार आहे. अधिवेशनादरम्यान लोकसभेचे हंगामी सभापती, ज्येष्ठ भाजप खासदार भर्तृहरी महताब हे नवनिर्वाचित खासदारांना शपथ देतील. लोकसभा सभापतीपदासाठी येत्या २६ जून रोजी निवडणूक होणार आहे. त्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर होईल.

**सीबीआय /नीट/जयंत पाटील**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-यूजी परीक्षेत अतिरिक्त गुण मिळालेल्या सर्व एक हजार ५६३ विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा आज घेण्यात आली. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या उच्चस्तरीय समितीच्या अहवालावर सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलेल्या निरीक्षणांच्या आधारे या विद्यार्थ्यांना दिलेले अतिरिक्त गुण रद्द करून फेरपरीक्षेचा निर्णय घेतल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं म्हटलं आहे.
नीट परीक्षा पेपरफुटीप्रकरणी तपासपथकानं आज पहाटे लातूर जिल्ह्यातल्या दोन शिक्षकांना अटक केली. हे दोघे शिक्षक नीट परीक्षेसाठी खासगी शिकवण्या चालवत होते. त्यांची चौकशी सुरू आहे. तर बिहार पोलिसांनी या प्रकरणातल्या ६ संशयितांना

झारखंडमधून अटक केली आहे. दरम्यान, नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचा तपास शिक्षण मंत्रालयानं सीबीआय, अर्थात केंद्रीय गुन्हे अन्वेषण संस्थेकडे सोपवला असून राष्ट्रीय चाचणी संस्थेचे महासंचालक सुबोध कुमार सिंग यांना पदावरून हटवलं आहे. भारतीय व्यापार प्रोत्साहन मंडळाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक प्रदीप सिंग खरोला यांच्याकडे एनटीएच्या महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

दरम्यान आज नियोजित असलेली वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठीची नीट-पीजी परीक्षा काल रात्री रद्द करण्यात आली. या परीक्षेचं सुधारित वेळापत्रक लवकरच प्रसिद्ध केलं जाईल, असं केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

तर या प्रकरणावरून राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारवर समाजमाध्यमातून टीका केली आहे. अवघ्या १२ तास आधी परीक्षा रद्द करणे नक्की कशाचे द्योतक आहे ? असा सवाल उपस्थित करत , प्रवेश परीक्षा राज्य पातळीवर घेण्यात येऊन राज्यांना याबाबतीत अधिक स्वायत्तता दिली जावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**राज्यपाल**

भारतानं जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचं तसेच नजीकच्या काळात ५ अब्ज डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचं उद्दिष्ट पुढ ठेवलं आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निर्यात क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असेल, असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी येथे केलं. फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशन्स (FIEO) या विविध क्षेत्रातील निर्यातक संघटनांच्या शिखर संस्थेतर्फे देण्यात येणारे पश्चिम क्षेत्राचे 'निर्यात उत्कृष्टता पुरस्कार' राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते मुंबईत प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे भंडारा दौरा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उद्या दिनांक 24 जून रोजी भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. यावेळी ते जिल्ह्यातील जलपर्यटन प्रकल्पाच्या पहील्या टप्प्याचे भूमिपूजन व भंडारा विधानसभा क्षेत्रातील 547 कोटींच्या विकास कामांच्या भूमिपूजन सोहळ्याला उपस्थित राहतील.

**देवेन्द्र फडणवीस**

गडचिरोलीतील जहाल माओवादी आणि जिल्ह्यातील नक्षली चळवळीचा म्होरक्या समजल्या जाणार्या गिरधरने पत्नीसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केलं. पोलिसांच्या या यशामुळे गडचिरोलीतील माओवादी चळवळीची कंबर

मोडली असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. देवेंद्र फडणवीस यांनी या दाम्पत्याला संविधानाची प्रत भेट दिली. पोलिस मुख्यालयातील एका छोटेखानी कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नक्षली दाम्पत्याला 25 लाख रुपयांची मदत पुनर्वसनासाठी करण्यात आली.

नांगसू मनकू तुमरेटी ऊर्फ गिरीधर याच्यावर 25 लाखांचे बक्षीस होते, तर त्याच्या पत्नीवर 16 लाखांचे बक्षीस होते. गडचिरोली जिल्ह्यातील वरिष्ठ नक्षली कमांड असलेल्या या दोन्ही नक्षल्यांनी आत्मसमर्पण केल्यानं जिल्ह्यातील नक्षलवादी कारवायांना मोठा हादरा बसला आहे.

## सुधीर मुनगंटीवार

'शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या खरीप हंगामाला सुरवात झाली आहे. पेरणीच्या वेळेस बियाणे, खते घेण्यासाठी शेतकऱ्यांना आज पीक कर्जाची अत्यंत गरज आहे. त्यामुळे पीक कर्ज वाटपाच्या प्रक्रियेची गती वाढवून शेतकऱ्यांना वेळेवर पैसे उपलब्ध करून द्यावेत,' असे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

काल चंद्रपूर इथं नियोजन सभागृहात आयोजित कृषी व कृषी संलग्न विभागासोबतच्या खरीप हंगाम आढावा बैठकीत ते बोलत होते.

## गडकरी अमरावती दौरा

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे आज अमरावती दौऱ्यावर होते. विदर्भाची कुलदेवता असलेल्या श्री अंबादेवी आणि श्री एकविरा देवीचे आज त्यांनी सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी आमदार प्रविण पोटे-पाटील तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

## ऑलिंपिक दिन

आज आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिन आहे. जगभरात खेळ आणि शारीरिक कसरतींना प्रोत्साहन देण्यासाठी १९४८ पासून हा दिवस साजरा केला जातो. यंदाच्या ऑलिंपिक दिनाचं घोषवाक्य ‘पुढे चला आणि साजरा करा’ अशी आहे. युवा आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. एकता आणि शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी खेळाच्या ऊर्जेचा वापर करायला हवा, असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**पद भरती प्रक्रिया**

शासनाच्या मृदा व जलसंधारण विभागाच्या 670 पदाची भरती प्रक्रिया रद्द झाल्यानंतर आता नव्याने ही फेरपरिक्षा घेण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार मंत्री संजय राठोड यांनी घेतला आहे. जलसंधारण अधिकारी स्थापत्य गट ब या संवर्गातील 670 पदे सरळसेवेने भरण्यासाठीची स्पर्धा परीक्षा यावर्षी दिनांक 20 व 21 फेब्रुवारीला टीसीएस-आयकॉन संस्थेच्या माध्यमातून घेण्यात आली होती. मात्र या परीक्षेचा पेपर फुटल्याचं लक्षात आल्यानंतर 52 हजार 690 विद्यार्थ्यांनी दिलेली हि परीक्षा रद्द करण्याचा निर्णय मंत्री संजय राठोड यांनी घेतला होता. आता ही फेरपरिक्षा 14,15 आणि 16 जुलै, 2024 रोजी ,TCS कंपनीच्या 10 अधिकृत केंद्रावरच घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परीक्षा पारदर्शक होण्यासाठी TCS आणि संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधीकारी यांना निर्देश दिले असल्याचं मंत्री संजय राठोड यांनी सांगितलं.

**मोबाईल सुविधेतून सक्षमीकरण**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर जिल्हयातील 13 तालुक्यातील प्रत्येकी एका आशा स्वयंसेविकेला प्रातिनिधिक स्वरूपात आज मोबाईल फोनचे वितरण करण्यात आले. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण प्रतिष्ठान यांच्या सौजन्याने जिल्हयातील ग्रामीण भागात कार्यरत १ हजार ९१० आशा सेविकांना मोबाईल फोन सुविधेच्या माध्यमातून आता अधिक सक्षम केले जात आहे.

ग्रामीण भागातील आशा सेविका या आरोग्य विभागाचा कणा आहेत. शासकीय कामकाजाशी निगडीत अनेक अहवाल, लाभार्थी नोंदणी हे ऑनलाईन पद्धतीने तथा ॲप्लिकेशनच्या माध्यमातून करणे क्रमप्राप्त झाले आहे. या कामांमध्ये आशा सेविकांना तत्परतेने काम करण्यास मदत होण्याच्या दृष्टीने त्यांना आधुनिक अँड्राईड मोबाईल देण्यात येत आहेत. प्रधानमंत्री मातृवंदन योजना, यू विन पोर्टल, आयुष्यमान भारत ई-कार्ड, आभा कार्ड तसेच अन्य ऑनलाईन कामे आता आशा सेविकांना या मोबाईलच्या मदतीने करणे सुलभ होईल. यासाठी खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत सुमारे १ कोटी ९० लक्ष रूपये निधी आरोग्य व्यस्थापन सुविधेसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

**हवामान**

केरळ, कर्नाटक आणि गोव्यात पुढचे चार दिवस अतिजोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तमिळनाडू, महाराष्ट्र आणि गुजरातमध्येही विजांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यांसह अतिजोरदार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, पुढील काही तासांत विदर्भातील सर्व जिल्हयांत तुरळक ठिकाणी वादळ आणि विजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

#####